ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80. Licence No. 175

वर्ष ३६ पुणे, बुधवार, १७ जून, १९७० अंक १२



आपल्या प्रेमाला मूर्त स्वरूप द्या: आपल्या प्रेमातील माणसांच्या भविष्यकाळासाठी तरतूद करा. त्यांच्यासाठी बचतीस सुरवात करण्याची दीरंगाई करू नका. आपल्या मुलांच्या नांवाने बँक ऑफ इंडियामध्ये सेव्हिंग्ज बँक खाती उघडा.

**कोरडे प्रेम काय कामाचे...**

**बँक ऑफ इंडिया**

RAAS/B/1098 MAR.




® वरील ट्रेडमार्क किर्लोस्कर प्रोप्रायटरी लिमिटेड या कंपनीच्या मालकीचा रजिस्टर्ड ट्रेडमार्क असून किर्लोस्कर ऑईल एंजिन्स लिमिटेड ही कंपनी त्याचा वापर करणारी अधिकृत कंपनी म्हणून नोंदविलेली आहे.

# THE BELGAUM BANK LIMITED

**Estd. 1930**

SCHEDULED BANK

*Regd. Office* : **659–60, Raviwar Peth, Belgaum**

**Share Capital : Rs. Over 8 Lakhs**

**Reserves : Rs. Over 8½ Lakhs**


**Deposits : Rs. 5 Crores & 75 Lakhs**

39 Branches in the States of Mysore & Maharashtra & Goa Territory – Major number of Branches in Rural Areas – Facility of Safe Deposit Lokers at Belgaum, Gokak and Nipani Branches in Mysore State.

**S. Y. KAMAT** *General Manager.*

**K. B. KIRTIKAR** *Chairman.*






**GADRE BROTHERS**


**ENGINEERS & FOUNDERS**


**MADHAVNAGAR (S. Rly.)**

Phone : 318 Sangli.

Gram : 'SEWA Madhavnagar







**इंजिन असो अगर इलेक्ट्रिक मोटार असो त्यांस “विजय” पंपाची आवश्यकता आहेच. विजय पंप विनातक्रार अखंड पाणीपुरवठा करतात.**

कारखानदार—

## न्यू विजय इंडस्ट्रीज लि.

विश्रामबाग–सांगली ( महाराष्ट्र )

फोन : २३१

तार : Vijayplow

☆ अर्थ ☆

बुधवार, १७ जून, १९७०



"स्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

*"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र*

## खाजगी उद्योगधंद्यांनी स्वतःच्या पायावर उभे राहावे

दक्षिण भारतीय गिरणीमालकसंघापुढे कोइमतूर येथे बोलताना मध्यवर्ती सरकारचे राज्यमंत्री श्री. आर. के. खाडिलकर ह्यांनी खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांनी आपापल्या पायावर उभे राहण्यास शिकावे असा सल्ला दिला आहे. आपल्या भाषणात ते पुढे म्हणाले की सरकारकडून मदतीची अपेक्षा त्यांनी करू नये. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यापासून हिंदी उद्योगधंद्यांना अशा मदतीचा लाभ झालेला आहे. उद्योगधंदे काढणाऱ्यांना लागणाऱ्या भांडवलापैकी ३० ते ६० टक्क्यांपर्यंत भांडवल त्यांना सरकारी संस्थाकडून मिळत असे. परंतु ह्यापुढे हीच परिस्थिती चालू राहण्याची शक्यता नाही. उलट सरकारला असे वाटते की उद्योगधंद्यांनी स्वतःचा विस्तार करावा आणि तसे करताना स्वतःच्या प्रयत्नांवरच विसंबून राहावे. उद्योगधंद्यांनी सरकारी आधारावर अवलंबून राहणे योग्य होणार नाही. कारण, त्यामुळे ग्राहकांवर अतिशय भार पडत जातो. उद्योगधंद्यांच्या विकासासाठी आता अनुकूल वातावरण निर्माण झाले आहे. गेल्या वर्षापासून आर्थिक परिस्थिती स्थिरावत चालली आहे. ह्याचा फायदा घेऊन उद्योगधंद्यांनी आपला विकास वेगाने साध्य करण्याचे आणि लोकांच्या आकांक्षा पूर्ण करण्याचे प्रयत्न केले पाहिजेत. देशापुढे काही सामाजिक उद्दिष्टे ठेवण्यात आलेली आहेत. ती साध्य करण्यासाठी उद्योगधंद्यांनी अल्पबचतीच्या मार्गाने स्वतःच्या साधनसामग्रीच्या गरजा भागविल्या पाहिजेत. सध्या भारतापुढे विकासाच्या अनेक दिशा पसरलेल्या आहेत. त्यांचा फायदा घेण्यासाठी लागणारे द्रव्यबळ उद्योगधंद्यांनी स्वतःच उभे करण्याची कोशीस केली पाहिजे.

---

## प्रगत व मागासलेल्या देशांतील दारिद्र्याची दरी

आंतरराष्ट्रीय मजूर परिषदेचे ५४ वे अधिवेशन जिनीव्हा येथे भरविण्यात आले होते. परिषदेला हजर राहण्यासाठी भारतामधून १३ जणांचे प्रतिनिधिमंडळ तेथे गेले होते. मंडळाचे नेते व भारत सरकारचे मजूरमंत्री श्री. डी. संजीवय्या ह्यांनी परिषदेपुढे भाषण केले. त्यात ते म्हणाले की प्रगत देश आणि मागासलेले देश ह्यांच्यातील तफावत वाढत चाललेली आहे. म्हणून प्रगत देश आणि आंतरराष्ट्रीय संघटना ह्यांनी ही तफावत कमी करण्यासाठी संयुक्तपणे उपाय योजले पाहिजेत. पहिल्या विकास दशकाच्या ह्या दोन गटांतील आर्थिक भरभराटीबाबत असलेले अंतर कमी झाले नाही. दुसऱ्या विकास दशकात हे व्यस्त प्रमाण भरून काढण्याचे प्रयत्न विशेष जोराने करण्यात आले पाहिजेत. पहिल्या विकास दशकात आर्थिक वाढीवर वाटणीपेक्षा अधिक जोर देण्यात आला. सामाजिक परिस्थिती आणि तीवर विकासकार्याचा होणारा परिणाम ह्याकडे दुर्लक्ष झाले. सर्व जगाचा विचार करता काही आर्थिक प्रगती झाली आहे ह्यात संशय नाही. तरीसुद्धा लोकसंख्येचा फार मोठा व महत्त्वाचा भाग उपेक्षितच राहिला आहे. धनवान आणि गरीब ह्यांच्यातील अंतर केवळ देशाचा विचार करतानाच प्रत्ययास येते असे नाही. देशातल्या देशात सुद्धा हे अंतर लक्षात येते. म्हणून समाजातील अगदी खालच्या थरापर्यंत आर्थिक प्रगतीचे फायदे पोचविले पाहिजेत. ह्या दृष्टीने भारताने केलेली प्रगती अगदीच दुर्लक्षणीय नाही. भारताची प्रगती पुरेशी नसली तरी प्रगतीच्या मार्गावर जोराने धावण्याचा प्रयत्न भारत करीत आहे. प्रगतीची गती वाढविण्याची कोशीस करण्यात येत आहे.

---

## दारूबंदीबाबत राज्य सरकारांचा अनुत्साह

दारूबंदी सुरू करण्याबाबत मध्यवर्ती सरकारने केलेल्या सूचनांना राज्य सरकारांकडून बेताचाच प्रतिसाद मिळत आहे. ह्याला अपवाद फक्त गुजरात आणि महाराष्ट्र ह्या दोन राज्यांचा आहे. पश्चिम बंगाल आणि काश्मीर राज्यांना दारूबंदीमुळे बुडणाऱ्या उत्पन्नापैकी निम्मे भरून देण्याची तयारी मध्यवर्ती सरकारने दाखविली आहे. तरीसुद्धा दारूबंदी अमलात आणण्याची त्यांची तयारी नाही. पंजाब व ओरिसा सरकारने असे कळविले आहे की सर्व देशभर दारूबंदी झाल्याशिवाय राज्यातील दारूबंदी यशस्वी होण्याची शक्यता नाही. ओरिसाने तर दारूबंदीमुळे होणाऱ्या नुकसानीची पूर्ण भरपाई करून देण्यात यावी अशी मागणी केली आहे. उत्तर प्रदेश व मध्य प्रदेश सरकारने उत्पन्नाची पूर्ण भरपाई आणि तीही कायम स्वरूपाची होत असेल तरच दारूबंदीची तयारी दाखविली आहे. राजस्थान आणि हरियाणा ह्या राज्यांच्या सरकारांनी दारूबंदीला तत्त्वतः मान्यता दर्शविली आहे, आणि नुकसानभरपाईची योजना सादर केली आहे. म्हैसूर, केरळ, बिहार व आंध्र प्रदेश ह्यांच्या सरकारांनी दारूबंदीसाठी देऊ करण्यात आलेल्या नुकसानभरपाईविषयी आपणास आस्था नसल्याचे

कळविले आहे. आसाम सरकारने ४ टप्प्यांत दारूबंदी सुरू करण्याची तयारी दर्शविली आहे. मात्र पहिली पाच वर्षे बुडणाऱ्या उत्पन्नाची व दारूबंदी खात्यात काम करणाऱ्या नोकरांच्या पूर्ण पगाराची मागणी केली आहे. नागालँडच्या सरकारने फक्त नेटके उत्तर धाडले आहे. उत्तरात असे म्हटले आहे की राज्यात दारूबंदी सुरू करण्यात आलेली नाही; तेव्हा बुडणाऱ्या उत्पन्नाबद्दल देण्याच्या नुकसानभरपाईचा प्रश्नच उद्भवत नाही.

---

### कलकत्त्यामधील अस्थिरतेचे दिल्लीत पडसाद

कलकत्ता शहरातील अस्थिर व अशांत परिस्थितीचे पडसाद दिल्लीमध्ये उमटू लागले आहेत. कलकत्त्यात नक्षलवादी चळवळीने उग्र स्वरूप धारण केल्यावर तेथील अनेक कंपन्यांनी आपल्या कचेऱ्या हलविल्या आहेत. त्यातील बऱ्याच कंपन्यांनी दिल्लीत स्थलांतर केले आहे. त्याचा परिणाम असा झाला आहे की दिल्लीमधील घरांची व कचेऱ्यांच्या जागांची भाडी भडकली आहेत. अर्थातच दिल्लीमधील स्थायिक लोकांना उपद्रव होऊ लागला आहे. कचेऱ्याबरोबरच त्यामधील बडे अधिकारीही दिल्लीत येत आहेत आणि राहण्याची जागा मिळविण्यासाठी भरमसाठ भाडी देऊ करीत आहेत. ४ आकड्यांतील पगार मिळविणाऱ्या ह्या अधिकाऱ्यांनी घरमालकांना मोह सुटण्यासारखी प्रलोभने दाखविण्यास प्रारंभ केला आहे. काही महिन्यांपूर्वी दोन झोपण्याच्या खोल्या व दिवाणखाना असलेली जागा दरमहा सुमारे ४०० ते ५०० रुपयांना मिळू शकत असे. आता त्याच जागेला ५५० ते ६०० रुपये द्यावे लागतात. त्याचबरोबर दिल्लीमधील नव्या घरांची बांधणीही मंदावली आहे. कारण घरे बांधण्याचा खर्च फार मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. नवीन घरे मिळवून देण्याचे काम बहुधा एजंटामार्फत होते. त्यांना घरे कोणाला व किती :भाड्याने द्यावे ह्याची पर्वा नसते. दिल्लीतील अनेक घरांचे मालक बाहेरगावी राहतात. वास्तविक त्यांना स्वतःसाठी घराची गरज नसते. पण जास्त भाडे मिळविण्याच्या लोभाने ते जुन्या भाडेकरूंना सतावून सोडून जागा सोडण्यास भाग पाडण्याचे प्रयत्न करू लागले आहेत. अशा रीतीने कलकत्त्यातील राजकीय स्थैर्य दिल्लीत धक्के देत आहे.

---

**सर्वांत मोठा पुतळा** — दिल्ली येथे मिंटो रस्त्यावरील तिकोना पार्कमध्ये छत्रपती शिवाजी महाराज ह्यांचा पुतळा उभारण्यात यावयाचा आहे. ब्रॉंझ धातूच्या ह्या पुतळ्याचे वजन ५ टन असेल आणि तो देशातील सर्वांत मोठा पुतळा ठरेल. पुतळ्याची बैठक २० फूट उंचीची असेल आणि तीवर १८ फूट उंचीचा पुतळा असेल. पुतळा बसविण्यासाठी ४ लाख रुपये खर्च येईल.

सरदारगृह

मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.

मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण

— आमची वैशिष्ट्ये —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.

* टिळक जन्मशताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक.

फोन नं. :-३८३३७] सरदारगृह प्रा. लि. [ तार—सरदारगृह

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

महाराष्ट्रातील नामवंत बँक

शेड्यूल्ड बँक] [स्थापना - १९३६

दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.

सातारा

रजिस्टर्ड ऑफिस : १४३–१४६, भवानी पेठ, सातारा शहर.

आपल्या ४३ शाखांनिशी आपल्या सर्व प्रकारच्या बँकिंगच्या सेवा आणि सुविधा. उपलब्ध करून देण्यात तत्पर.

खेळते भांडवल : १२ कोटींचे वर

ठेवी : ११·७५ कोटींचे वर

ठेवींचे आकर्षक व्याजाचे दर.
तऱ्हेतऱ्हेच्या उद्योगधंद्यांस साहाय्य.
कोणत्याही शाखेस भेटा अगर लिहा.

वि. श्री. दामले

बी. ए., एम्. कॉम्., एल्एल् बी, सी. ए. आय्आय्. बी. चेअरमन

## केसांच्या निर्यात व्यापाराची आंतरराष्ट्रीय स्पर्धा

माणसांचे केस निर्यात करून भारत परदेशीय चलन मिळवतो. केसांचे टोप करून ते परदेशी धाडण्यात येतात. हा माल तयार करण्याचा कारखाना मद्रास येथे आहे. टोपांची बहुतेक निर्यात अमेरिकला करण्यात येते. परंतु आता ह्या निर्यात व्यापाराला दोन्ही बाजूंनी धोका निर्माण होत आहे. अमेरिकेत आणि जपानमध्ये टोप तयार करण्यासाठी केसासारखे कृत्रिम धागे तयार करण्यात येऊ लागले आहेत. भारतामधून ह्या मालाची निर्यात स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशनकडून होत असते. कॉर्पोरेशनकडे आलेल्या माहितीप्रमाणे हिंदमध्ये तयार झालेल्या केसांच्या टोपांची निर्यात नव्या कृत्रिम केसांच्या निर्मितीमुळे घटत चालली आहे. अमेरिकेतील ड्युपॉट ह्या प्रसिद्ध कारखान्याने कृत्रिम केसांची पैदास प्रथम सुरू केली. अलीकडे जपानमधील अशाच कारखान्यांनी कृत्रिम केसांच्या निर्मितीत बरीच सुधारणा केली आहे. परिणाम असा झाला आहे की कृत्रिम केसांचे टोप बरेच स्वस्त देणे परवडत आहे. शिवाय ह्या टोपांना निरनिराळ्या प्रकारच्या टोप्यांसारखा आकार देणे सोपे जाते. अर्थातच स्त्रिया निरनिराळ्या वेळी वापरण्यास योग्य अशा प्रकारच्या अनेक टोपांच्या टोप्या जवळ बाळगून आपली हौस भागवू शकतात. मद्रास येथील टोपांच्या कारखान्यातही कृत्रिम केसांचा वापर करण्याचा विचार करावा लागेल अशी चिन्हे दिसत आहेत. असे न केल्यास मद्रासमधील कारखान्यांची सर्व उत्पादनक्षमता कारणी न लागण्याची शक्यता आहे. कृत्रिम केसांच्या टोपांना नैसर्गिक केसांच्या टोपांपेक्षा अधिक मागणी येईल काय, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

टोपांच्या निर्यातीला दुसऱ्या एका बाजूने शह मिळणार असे दिसत आहे. नैसर्गिक केसांच्या निर्यात व्यापारात इतर काही देश स्पर्धा करू लागले आहेत. पाकिस्तान, नेपाळ आणि इंडोनेशिआ ह्या देशांतून नैसर्गिक केसांच्या टोपांच्या निर्यातीला उत्तेजन देण्यात येत आहे. निर्यात कारखानदारांना व व्यापाऱ्यांना त्यासाठी मुद्दाम खास सवलती देण्यात येत आहेत. त्यामुळे भारताच्या निर्यातीला, चांगलीच स्पर्धा निर्माण होत आहे. राजकीय क्षेत्रात अमेरिका आणि चीन ह्यांचे विळ्या-भोपळ्याइतके सख्य आहे. पण अलीकडे त्यांच्यातील राजकीय वैमनस्य विरळ होत चालल्याची चिन्हे दिसत आहे. परस्परांत व्यापारी संबंध जोडण्याची इच्छा ह्या दोन्ही देशांत दिसून येऊ लागली आहे. ती वाढीस लागल्यास अमेरिकेत चिनी केसांच्या टोपांची निर्यात एकदम झपाट्याने होऊ लागेल. ही स्पर्धा मात्र भारताला वर्मी घाव घातल्यासारखी ठरण्याचा संभव आहे. ह्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन काही उपाययोजना करीत आहे. केसांसाठी द्यावयाच्या किमान किमती ठरविण्यात आल्या होत्या. आता त्या रद्द करण्यात आल्या आहेत. त्यामुळे केसांच्या किमती घटून टोप स्वस्त विकण्यास परवडेल. पश्चिम युरोपात कृत्रिम भुवया लावण्याची फॅशन पसरलेली आहे. तिचा फायदा घेऊन कृत्रिम भुवयांची निर्मिती व निर्यात करण्याचा विचार कॉर्पोरेशन करीत आहे. ह्यासंबंधी ब्रिटनमधील एका कारखान्याशी संपर्क साधण्यात आला आहे. मद्रास येथील कारखान्यांतील दोन मुलींना ब्रिटिश कारखान्यात प्रशिक्षण घेण्यासाठी पाठविण्यात आले आहे.

---

## मॅनेजिंग डायरेक्टरचा पगार व इतर फायदे

न्यू इंडिया अश्युरन्स कं. लि. ने श्री. बी. के. शहा ह्यांची मॅनेजिंग डायरेक्टर म्हणून फेरनेमणूक करण्याचे ठरविले आहे, त्याच्या अटी खालीलप्रमाणे आहेत. त्यांस कंट्रोलर ऑफ इन्शुअरन्सची आणि सरकारची मंजुरी मागितली आहे.

| | |
|---|---|
| १. मुदत | : २९ सप्टेंबर, १९७० पासून ४ वर्षे. |
| २. पगार | : दरमहा ७,००० रु. |
| ३. सरबराई भत्ता | : दरमहा ७५० रु. |
| ४. सभा भत्ता | : इतर डायरेक्टरांस मिळेल तेवढा. |
| ५. वाहन | : कंपनीची मोटार, ड्रायव्हरसह, कंपनीच्या आणि खासगी कामासाठीही. |
| ६. पेन्शन | : दरमहा १,७५० रु. |
| ७. टेलिफोन | : निवासस्थानी. |
| ८. घर | : योग्य त्या प्रकारचे. श्री. शहांनी पगाराच्या १२½% रक्कम द्यावयाची. फर्निचर, फिटिंग्ज, फिक्श्चर्स कंपनीची. |
| ९. वैद्यकीय सोई | : घरी किंवा इस्पितळात, स्वतःसाठी आणि पत्नीसाठी, दरसाल ५,००० रु.; तीन वर्षांत १५,००० रु. पर्यंत. |
| १०. हक्काची रजा | : २८ सप्टेंबर, १९७० पर्यंत साठलेली आणि २४० दिवसांची आजाराची रजा. |
| ११. निवृत्ती | : उभयपक्षी ६ महिन्यांच्या नोटिसीने. |
| १२. इतर | : मॅ. डायरेक्टराने सर्व वेळ कंपनीच्या कामासाठी द्यावयाचा आहे. |

---

## बँक लुटण्याची पूर्वतयारी वाया गेली

दुर्गापूर येथील एका बँकेतून १ कोटी रुपये लुटणाऱ्या टोळीतील काही जणांना अगोदरच पकडल्यामुळे हा दरोडा टळला. टोळीवाल्यांनी दुर्गापूर येथे काही फ्लॅट भाड्याने घेतले होते आणि बँकेच्या कर्मचाऱ्यांशी दोस्ती केली होती. त्यांनी बँकेजवळ एक कँटीनही उघडले होते. आपल्या माणसांना चहा वगैरे पोचविण्यासाठी बँकेत केव्हाही जाता यावे, तेथील कॅश ठेवण्याची जागा परिचयाची व्हावी आणि किल्ल्या कुणाजवळ असतात हे समजावे, हा त्या कँटीनचा उद्देश होता. दरोड्याच्या नियोजित वेळेच्या आधी दोनच तास पोलिसांना बँकेशेजारील एका पुलाखाली डायनामाइटचे साहित्य सापडले आणि टोळीतील काहीजणांचा सुगावा लागला.

### ही जुनी विमाने घेण्यास कोण तयार होणार !

दिल्ली येथील सफदरजंग विमानतळावर इंडिअन एअर-लाइन्सच्या मालकीची 'डॅकोटा' जातीची विमाने विकाऊ आहेत. पण ती घेण्यास गिऱ्हाइके पुढे येण्याचा फारसा संभव नाही. इंडिअन एअरलाइन्स नवीन अद्ययावत विमाने वापरणार असल्यामुळे कंपनीला आता ह्या जुन्या विमानांचा उपयोग नाही. विमानविद्येत गेल्या काही वर्षांत झालेली विलक्षण प्रगती ह्या परिस्थितीस जबाबदार आहे. एके काळी ह्याच विमानांना प्रत्येकी २ लाख रुपये मोजावे लागत होते. कंपनीने काही वर्षांपूर्वी 'व्हाइकिंग' जातीच्या विमानाच्या विक्रीसाठी सर्व जगातून टेंडर्स मागविली होती. पण त्याचा काही उपयोग झाला नाही. अखेर विमाने मोडीच्या भावाने वजन करून विकण्यात आली. कंपनीने १५ वर्षांपूर्वी ७५ डॅकोटा विमाने युद्धकाळातील शिलकी मालातून घेतली होती. त्या वेळी त्यांना प्रत्येकी १५ हजार रुपये द्यावे लागले होते. नंतर ही विमाने बंगलोर येथील कारखान्यात नेण्यात येऊन उड्डाणपात्र करण्यात आली. त्यासाठी बराच खर्चही आला. परंतु त्या वेळी भारतात विमान तयार करण्याचे मोठे कारखाने सुरू झालेले नव्हते. अर्थातच कंपनीला त्याचा चांगला उपयोग झाला. आता कंपनीजवळ २३ डॅकोटा विमाने शिल्लक आहेत, ती सर्वच विकण्यात येणार नाहीत. कारण, काही मार्गांवर ही विमाने अद्यापही उपयुक्त ठरत आहेत. ती वजनाने हलकी असतात आणि उतरण्यासाठी त्यांना फारशी लांब धावपट्टी लागत नाही. पण, त्यात फक्त २१ प्रवासीच नेण्याची सोय असल्याने त्यांचा वापर करणे आर्थिक दृष्ट्या न परवडणारे होऊ लागले. म्हणून १९६० पासून नवीन बनावटीची विमाने वापरण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात आला.

---

### दंतवैद्यकात क्रांतिकारी सुधारणा

दुसऱ्या महायुद्धानंतर औद्योगिक दृष्ट्या प्रगत देशांत वैज्ञानिक व तांत्रिक प्रगती अतिशय वेगाने झाली. त्यामुळे अनेक उद्योगधंद्यांतील उत्पादनाची प्रक्रिया व साधने ह्यांच्यात बदल झाला. जुनी तंत्रे व साधने निरुपयोगी अगर टाकाऊ ठरू लागली. अणुविज्ञान युगात अशी उलथापालथ फक्त औद्योगिक क्षेत्रापुरतीच मर्यादित राहणार नाही अशी चिन्हे दिसू लागली आहेत. ऑस्ट्रेलिआतील दंतवैद्यकाच्या एका नामांकित प्राध्यापकांनी असे भाकित केले आहे की माणसाच्या दातावरील कठीण कवच आणखी कठीण करण्यासाठी अणुकिरणांचा उपयोग करता येईल. त्यामुळे दात लवकर खराब होणार नाहीत. दंतवैद्यकात आणखीही क्रांतिकारी सुधारणा होतील. पण त्यांना अद्याप १०० वर्षे लागतील. मग मात्र कृत्रिम दाताच्या कवळ्या बसविणे इतिहासजमा होईल.

---


## दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

मुख्य कचेरी : ९ बँक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई १.

प्रादेशिक कचेरी : महाल, नागपूर

| | | |
|---|---|---|
| भाग-भांडवल व निधी | रु. | १४,६२,२०,००० |
| ठेवी | रु. | ७४,५७,३६,००० |
| खेळते भांडवल | रु. | १,४२,०९,१२,००० |

१. ठेवींवरील व्याजाचे आकर्षक दर.
२. सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.
३. देशातील सर्व प्रमुख ठिकाणी बिलवसुलीची व्यवस्था.
४. राज्यात १००० हून अधिक कचेऱ्या असणाऱ्या सहकारी पत-पुरवठा व्यवस्थेतील शिखर संस्था.

सामुदायिक हितासाठी सदैव झटणारी बँक

तारेचा पत्ता : "मॉर्गेज"
दूरध्वनी : मुख्य कार्यालय २६७८०१/२/३
कार्यकारी संचालक २६१४९७

## दि बॉंबे स्टेट को-ऑपरेटिव्ह लँड मॉर्गेज बँक लि.

जे. के. बिल्डिंग, १ ला माळा, नरोत्तम मोरारजी मार्ग,
बॅलार्ड इस्टेट, मुंबई नं. १.
( स्थापना १९३५ )

महाराष्ट्र राज्यातील २७ प्राथमिक भूविकास बँका ह्या बँकेस संलग्न आहेत. बँकेने तगाई योजनेखाली विहिरी, ऑईल इंजिन्स, पंपिंग सेट्स, इलेक्ट्रिक मोटर्स तसेच जमीनसुधारणेकरिता कर्ज-वाटपाचा व्यवहार हाती घेतला आहे. जून १९६९ अखेर बँकेचे भागभांडवल ६ कोटी ६६ लाख, गंगाजळी ४५ लाख, ऋणविमोचन निधीची गुंतवणूक २८ कोटी व येणे कर्ज ८५ कोटी आहे.

नी. आ. कल्याणी
अध्यक्ष

रा. गो. गोखले
व्यवस्थापक

जी. पी. भावे
कार्यकारी संचालक

## स्टुडिओ पार्करसनची व्यावसायिक प्रगती

### पंधरा वर्षांची तपश्चर्या : आय. इ. एन. एस. ची मान्यता

पुण्यातील " स्टुडिओ पार्करसन " या कमर्शिअल आर्टिस्टस् व जाहिरात वितरण संस्थेच्या स्थापनेला यावर्षी १५ वर्षे पूर्ण झाली आय. इ. एन. एस. संघटनेतर्फे या अॅडव्हरटायझिंग एजन्सीला राष्ट्रीय पातळीवर वृत्तपत्रांमधून जाहिरात करण्याचे विशिष्ट अधिकार व अधिकृत मान्यताही अलीकडेच मिळाली. या निमित्ताने सकाळचे संपादक डॉ. ना. भि. परुळेकर यांचे अध्यक्षतेखाली रविवार, दिनांक १४ रोजी उद्यान कार्यालयात एक समारंभ आयोजित केला. त्या वेळी स्वस्तिक रबर प्रॉडक्टसचे मॅ. डायरेक्टर श्री. वसंतराव वैद्य हे प्रमुख पाहुणे होते. जाहिरात एजन्सीच्या व्यवसायाला आ. इ. एन. एस. ची मान्यता ही एक महत्त्वपूर्ण घटना आहे. त्यामुळे स्टुडिओ पार्करसनच्या प्रगतीस खूपच वाव आणि चालना मिळणार आहे. आम्ही ह्या



श्री. भद्रसेन पराडकर

निमित्ताने संस्थेचे प्रमुख श्री. भद्रसेन पराडकर ह्यांचे हार्दिक अभिनंदन करून त्यांच्या व्यवसायाला उज्ज्वल भवितव्य चिंतितो.

मुंबई, दिल्ली, कलकत्ता, मद्रास सारख्या शहरांमध्ये जाहिरात-व्यवसाय-क्षेत्रात प्रगती व आर्थिक सुबत्ता यांचे अत्युच्च शिखर गाठले गेलेले आढळते, एवढे की देशातील एकूण जाहिरात-व्यवसायांपैकी ६० टक्के व्यवसाय या बोटावर मोजण्याइतक्या शहरांमध्ये केंद्रीभूत झालेला आहे. भरपूर भांडवल, छपाई, ब्लॉक मेकिंग, फोटोग्राफी, टाईप सेटिंग वगैरे तांत्रिक व आर्थिक सवलतींची उपलब्धता, व या व्यवसायातील तज्ज्ञ व अनुभवी मनुष्यबळ या गोष्टींचे आधारावर या शहरामधील मोठ्या अॅडव्हरटायझिंग एजन्सीज दिवसेंदिवस आणखी मोठ्या होत असून लहान व मध्यम भांडवलाच्या एजन्सीज लहान राहिल्या आहेत.

राष्ट्रीय पातळीवर बाजारपेठांमधे उतरलेले कारखानदार (अॅडव्हरटायझर्स) वगळल्यास देशात आज जाहिरात व प्रसिद्धी माध्यमांवर अल्प प्रमाणावर खर्च करणाऱ्या उद्योगधंद्यांची संख्या फार मोठी आहे. अशा उद्योगधंद्यांच्या विक्री-क्षेत्रात लहान अथवा मध्यम भांडवलाच्या वैयक्तिक लक्ष देणाऱ्या एजन्सीज त्यांना जास्त जवळच्या आहेत. त्यांचे अस्तित्व जाहिरात-व्यवसायात आज प्रकर्षाने जाणवू लागले आहे. या विचारसरणीस स्टुडिओ पार्करसनसारख्या एजन्सीने पाठपुरावा दिला आहे.

वयाच्या १७ व्या वर्षी मुंबईला जे. जे. स्कूल ऑफ आर्टस् येथे चित्रकलेचे प्राथमिक धडे घेतल्यावर स्टुडिओ पार्करसन या संस्थेचे संचालक श्री. बी. टी. पराडकर यांनी मुंबईलाच काही वर्षे विक्री-व्यवसाय क्षेत्रांत काम केले. प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती व काही भेटीच्या वस्तू यांची मुंबईला घरोघरी जाऊन त्यांनी विक्री केली. यांत त्यांना आलेले अनुभव हेच त्यांच्या उपजत असलेल्या चित्रकलेच्या छंदास मूर्त स्वरूप देण्यास कारणीभूत ठरले. १९५२ मध्ये पुण्यास आल्यावर त्या वेळेच्या मंडईजवळच्या भाड्याच्या घरांत त्यांनी छोटेसे ऑफिस उघडले. सुरुवातीच्या काळात पुस्तकाच्या मुखपृष्ठांची डिझाईन्स, लेबल्स, कार्टून्स, ब्लॉक्स करणे, इत्यादी कामे करण्यास त्यांनी सुरुवात केली. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे सेक्रेटरी श्री. रामभाऊ मोहाडीकर, प्रा. वि. पां. वोकील, टी वॉर्कर्सचे श्री. तळवलकर, वगैरे व्यक्तींनी त्यांना प्रोत्साहन दिले. सुरुवातीस उत्तेजन म्हणून पीस वर्क देणारे उद्योगधंदे व कारखाने यातील व्यक्ती-मुळेच त्यांना कायम स्वरूपाचा धंदा त्यांजकडून मिळू शकला.

ग्राहक, कारखानदार, यांना महत्त्व पटवून दिल्यास जाहिराती व त्यांच्याशी संलग्न अशा माध्यमांवर माफक खर्च करण्यास ते तयार होतात. पुण्यात आज प्रतिवर्षी ५,००० ते २५,००० रु. जाहिरातींवर खर्च करणारे बहुसंख्य कारखानदार त्यांचे ग्राहक आहेत. महाराष्ट्रात व विशेषत: पुणे व आसपासच्या विभागात उद्योगधंदे निघत आहेत. जाहिरात-व्यवसायाला त्यामुळे एक मोठे कार्यक्षेत्र निर्माण झाले आहे. ग्राहकांशी सतत संपर्क ठेवून बाजारपेठा व जाहिरात-निर्मितीमधील तांत्रिक समस्यांचा अभ्यास करणे आवश्यक असते.

सचोटी व जिद्द या भांडवलावर महाराष्ट्रातील जाहिरात-व्यवसायात आज त्यांनी आपल्या संस्थेस मानाचे स्थान प्राप्त केले आहे. वृत्तपत्रे, मासिके, होर्डींग्ज, निऑन साईन, प्रिंटिंगची विविध कामे, बुकलेटस्, पोस्टर्स, शो कार्डस्, सिने स्लाइडस् वगैरे विविध माध्यमांच्या द्वारा त्यांनी महाराष्ट्रात व देशातील कानाकोपऱ्यात आपल्या ग्राहकांच्या मालाची जाहिरात व प्रसिद्धी केली आहे. डेक्कन जिमखाना भागातील त्यांच्या ऑफिसमध्ये आज आर्ट, मीडिया, अकाऊन्टस, वगैरे खात्यांमध्ये दहाहून अधिक लोक काम करतात. केवळ पैसे मिळविणे हे जाहिरात वितरण संस्थेचे ध्येय नसावे तर व्यवसायात निष्ठा ठेवून ग्राहकांना जास्तीत जास्त समाधान देणे हे व्यवसायाचे ब्रीद वाक्य असल्यावर जाहिरात वितरण संस्था उत्कृष्ट व्यावसायिक यश मिळवू शकते हे स्टुडिओ पार्करसन संस्थेने दाखवून दिले आहे.

## राज्यांना सोडतीपासून मिळणारे उत्पन्न

केरळमधील मार्क्सवादी संयुक्त आघाडीच्या सरकारने १९६८ च्या जानेवारीत सोडत काढली. तेव्हापासून अनेक राज्यांनी ह्या मार्गाने पैसा उभारण्यास प्रारंभ केला. आतापर्यंत निरनिराळ्या राज्यांनी काढलेल्या सोडतीपोटी सुमारे ४७ कोटी रुपये गोळा करण्यात आले. त्यांपैकी २० कोटी रुपये बक्षिसे वाटण्यासाठी आणि सोडतीचा खर्च भागविण्यासाठी लागले. उरलेले २६ ते २७ कोटी रुपये राज्यसरकारांच्या खजिन्यांत निव्वळ नफा म्हणून गेले. तामीळनाडू राज्याने ११·८० कोटी रुपये गोळा केले. त्यानंतर महाराष्ट्राने १० कोटी रुपये गोळा करून दुसरा क्रमांक पटकाविला. गुजरात राज्याने मात्र सोडत हा जुगार असल्याचे मानून सोडत काढण्याचे नाकारले. महाराष्ट्र सरकारने १९६९ च्या एप्रिलपासून सोडत सुरू केली. सर्व राज्यांच्या सोडती यशस्वी झाल्या. पण काही राज्यांना ह्या व्यवहारात फारसा नफा झालेला नाही. त्यामुळे त्यांनी एका राज्यातील सोडतीची तिकिटे दुसऱ्या राज्यात विकण्यास बंदी करावी असा आग्रह मध्यवर्ती सरकारकडे धरला. राज्यसभेच्या नुकत्याच संपलेल्या अधिवेशनात अशी विक्री बेकायदा करणारे बिल मांडण्यात आले आहे. मध्य प्रदेशात पंजाब व हरिआना राज्यांच्या तिकिटांची चलती आहे. मध्य प्रदेशाप्रमाणेच राजस्थान सरकारला सोडतीपासून फारसे उत्पन्न मिळाले नाही. मध्यप्रदेश सरकारला ५ सोडतींत अवघे २० लाख रुपये मिळाले. राजस्थान सरकारला ५० लाख रुपये मिळाले. ओरिसाला सगळ्यात कमी उत्पन्न मिळाले. तामीळनाडूला ६·६८ कोटी रुपये आणि महाराष्ट्र-राज्याला ४·५ कोटी रुपये निव्वळ नफा राहिला.

---

## न्यूयॉर्क राज्याच्या सोडतीचे अवाढव्य बक्षीस

न्यूयॉर्क राज्याच्या सोडतीने १० लाख डॉलर्स अथवा ७५ लाख रुपयांचे अवाढव्य बक्षीस जाहीर केले आहे. ह्या सोडतीचे भाग्यवान नंबर येत्या ऑक्टोबरमध्ये काढण्यात येणार आहेत. राज्याच्या नेहमीच्या सोडतीचे तिकीट १ डॉलर अथवा ७॥ रुपयांचे असते. ऑक्टोबरमध्ये फुटणाऱ्या सोडतीचे तिकीट प्रत्येकी ३ डॉलर अथवा २२·५० रुपयांचे आहे. नेहमीच्या सोडतीचे बक्षीस १ लाख डॉलर्सचे असते. सोडतीच्या संचालकांनी असे जाहीर केले आहे की सोडत जिंकणाऱ्या नशीबवानास सर्व रक्कम एकदम घेता येईल किंवा दरसाल ५० हजार डॉलर्स अशा हप्त्यानेही घेता येईल. बक्षीस जिंकणाराने रक्कम हप्त्याने घेण्याचे ठरविल्यास त्याला भराव्या लागणाऱ्या करात मोठी बचत करता येईल. त्यामुळे अर्थातच सोडतीची किंमत वाढेल. भारतातील राज्यांत सध्या चालू असलेल्या सोडतींत सर्वात मोठे बक्षीस तामीळनाडू राज्याने १० लाख रुपयांचे दिलेले आहे.






## इम्रि किर्लोस्कर इंडस्ट्रीज फिलिपाइन्स इन् कॉर्पोरेटेड फिलिपाइन्समधील कारखाना

गेली १६ वर्षे किर्लोस्कर ऑईल इंजिन्स लि. कित्येक देशांकडे डिझेल इंजिने निर्यात करीत आहे. फिलिपाइन्स अशा इंजिनांची मोठी बाजारपेठ आहे, परंतु फिलिपाइन्सच्या सरकारने आयातीवर कडक निर्बंध घातले असल्यामुळे कंपनीला तेथे फारशी इंजिने विकता येत नाहीत. त्याचबरोबर फिलिपाइन्सच्या सरकारने तेथे कारखाने उभारण्यास प्रोत्साहन दिले आहे. तेथील आपल्या मालाचे वितरक, इम्रि इंडस्ट्रिअल सेल्स कॉर्पोरेशनच्या सहकार्याने तेथे २० अश्वशक्तीच्या खालची इंजिने बनविण्याची योजना किर्लोस्कर कंपनीने भारत आणि फिलिपाइन्स सरकारांना सादर केली, ती दोघांनीहि तत्त्वतः मान्य केली. इम्रि किर्लोस्कर इंडस्ट्रीज फिलिपाइन्स इन् कॉर्पोरेटेड ही कंपनी इंजिनांचे उत्पादन करील. ४ लक्ष पेसो ( ७·७६ लक्ष रु.) भांडवल किर्लोस्कर कंपनी घालील; बाकीचे फिलिपाइन्समधील लोक देतील. कंपनी पहिल्या वर्षी १,८०० इंजिने तयार करील आणि उत्पादन वाढवीत वाढवीत १० वर्षांच्या अखेरीस ते ८,००० इंजिनांवर जाईल. किर्लोस्कर कंपनी तज्ज्ञ पुरवील, त्याचप्रमाणे सोईस्कर हप्तेबंदीने यंत्रसामग्रीही देईल. 'टेक्निकल नोहौ' आणि 'रॉयल्टी' मिळून किर्लोस्कर कंपनीला १५ वर्षांपर्यंत २·५% मिळत राहतील.

---

## श्रीयुत डी. वाय. मेंच यांचे आकस्मिक देहावसान

श्री महावीर को. ऑप बँकेचे गेले कित्येक वर्षे अध्यक्ष असलेले आप्पा मेंच या नावाने सर्वत्र ओळखले जाणारे श्रीयुत डी. वाय. मेंच यांचे ता. ८-६-७० इ. रोजी हृदयविकाराने वयाच्या ५० व्या वर्षी रात्री १२ वाजता देहावसान झाले, हे नमूद करण्यास दुःख होते.

अर्बन बँकांच्या क्षेत्रात श्री महावीर बँक ही एक अग्रगण्य बँक आहे. या बँकेची भव्य वास्तू शाहुपुरीत उभी केली असून, रत्नाकर बँकेचीही इमारत पुरी झाली आहे. महावीर, रत्नाकर, या बँकांच्या मार्फत अत्यंत उत्साही व चिकाटीने काम करणाऱ्या तरुणांना प्रोत्साहन करणारे ते होते. अत्यंत प्रेमळ, मनमिळाऊ व चिकाटीचे, तत्त्वनिष्ठ कार्यकर्ता म्हणून ते सर्वांना परिचित होते. ते मूळचे कागलचे. शाहुपुरीतील पेठेत त्यांचे दुकान होते. शिक्षण पुरे होण्यापूर्वीच ते राष्ट्रीय भावनेने प्रेरित होऊन, १९३८ पासून स्वातंत्र्यलढ्यात सामील झाले. १९४२ च्या स्वातंत्र्यलढ्यातील त्यांची मदत अविस्मरणीय होय. त्यानंतर महावीर बँक, खादी ग्रामोद्योग, रत्नाकर बँक, दक्षिण भारत जैन सभा, देशभूषण हायस्कूल, जैन बोर्डिंग, या अनेक संस्थांशी त्यांचा निकट संबंध होता.

---

## आर्थिक विकासाला सरकारी धोरणाचा अडथळा

मद्रास येथील एका आर्थिक संघटनेपुढे बोलताना रिझर्व्ह बँकेचे एक माजी गव्हर्नर श्री. एच. व्ही. आर. अय्यंगार ह्यांनी सरकारच्या आर्थिक धोरणावर कडक टीका केली आहे. सरकारच्या आर्थिक धोरणाविषयी बोलताना ते म्हणाले की, ही धोरणे समतेवर आधारलेली समाजरचना उभारण्याच्या तीव्र आस्थेमधून जन्म पावलेली आहेत. परंतु त्यामुळे देशाच्या आर्थिक विकासाला अडथळे उत्पन्न होत आहेत. अधिकारारूढ काँग्रेसच्या आर्थिक धोरणांत एक सूत्र आढळून येते. ते म्हणजे विचार करण्याची एक विशिष्ट परंपरा. ह्या परंपरेला राजकीय दृष्टिकोणाचा सतत आधार देण्यात येत असतो. परंतु विशिष्ट राजकीय दृष्टिकोणाच्या चौकटीत आर्थिक विकास बसेलच असे नाही. उलट, त्यामुळे विकासाला मारक अशी परिस्थिती निर्माण होईल. सरकारने एप्रिल महिन्यापासून उद्योगधंद्यांतील मॅनेजिंग एजन्सीची पद्धत एकदम बंद केली. परंतु नंतर उद्योगधंदे कसे चालवावयाचे ह्याविषयी काही विचारच केला नाही. परिणामी सर्वत्र गोंधळ माजला आहे. मॅनेजिंग एजन्सीची पद्धत बंद झाल्यामुळे शेकडो कंपन्यांपुढे मॅनेजिंग डायरेक्टर्स व इतर वरिष्ठ अधिकारी नेमण्याचा प्रश्न उत्पन्न झाला आहे. पूर्वी उद्योगधंद्यांसाठी लागणारा तज्ज्ञ नोकरवर्ग मॅनेजिंग एजंट्स पुरवीत असत. कंपन्यांच्या अनेक गटांना हा फायदा मिळत असे. मॅनेजिंग एजन्सीची पद्धत बंद करण्याचा निर्णय सरकारने समाजवादी दृष्टिकोणातून घेतला. पोलादाच्या व मोटारींच्या किमतीबाबतचे सरकारी धोरण आणि अनेक उद्योगधंद्यांच्या राष्ट्रीयीकरणाच्या संकल्पित योजनाही अशाच घाईगर्दीच्या आहेत.

---

## पूर्व पाकिस्तानातून भांडवलाचे पलायन

पूर्व पाकिस्तानातील अस्थिर परिस्थितीमुळे तेथील भांडवल पश्चिम पाकिस्तानात स्थलांतर करू लागले असल्याची वार्ता आहे. पूर्व पाकिस्तानमधील राजकीय पुढाऱ्यांनी ह्यासंबंधी चिंता व्यक्त केली आहे. ह्यावर उपाय म्हणून पूर्व पाकिस्तानच्या दोघा माजी मुख्य मंत्र्यांनी अशी सूचना केली आहे की बँकांना भांडवलाचे असे स्थलांतर करण्यास बंदी करण्यात यावी. चोरट्या भांडवल निर्यातीवर नजर ठेवता यावी म्हणून पश्चिम पाकिस्तानातील उद्योगपती व व्यापारी ह्यांनी पूर्व पाकिस्तानमधील त्यांच्या मालमत्तेची माहिती जाहीर करावी असा आग्रह त्यांनी धरला. जानेवारी १९६९ ते एप्रिल १९७० ह्या कालात पूर्व पाकिस्तानमधून किमानपक्षी ९० कोटी रुपयांचे औद्योगिक भांडवल पश्चिम पाकिस्तानात गेले, असा एक अंदाज आहे. दुसऱ्या एका अंदाजाप्रमाणे १९७० च्या पहिल्या ५ महिन्यांत पूर्व पाकिस्तानातील बँकांनी ५० कोटी रुपये भांडवल पश्चिम पाकिस्तानात पाठविले.

---

### हिंदी रेल्वे एंजिनिअरांची परदेशी कामगिरी

इराकमधील ४०० किलोमीटर लांबीच्या एका संकल्पित रेल्वेमार्गाची प्राथमिक पाहणी करण्यासाठी हिंदी रेल्वे एंजिनिअरांची एक तुकडी गेली होती. तिने आपले काम झपाट्याने पुरे करत आणले आहे. एकूण पाहणीपैकी तीनचतुर्थांश काम तुकडीने ठरलेल्या कालावधीच्या अर्ध्यापेक्षाही कमी वेळात पुरे केले. रेल्वेमार्गाची पाहणी व आखणी करण्याच्या कामात हिंदी एंजिनिअर्सनी परदेशांत चांगला लौकिक कमाविला आहे. दक्षिण अमेरिका आणि मध्यपूर्वेतील देश ह्यातून त्यांनी अशी कामे केली आहेत. युराग्वे ह्या देशाने २०० किलोमीटर लांबीच्या एका रेल्वेमार्गाची व त्यावरील पुलाची पाहणी करण्यासाठी १९६८ मध्ये हिंदी रेल्वे एंजिनिअरांची मदत मागितली होती. इराणमधील रेल्वेमार्गाचा विस्तार करण्यासाठी सहकार्य करण्याचा एक करार उभयता देशांत चालू वर्षी करण्यात आला आहे.

### कागदासाठी लागणाऱ्या लगद्याची निर्यात

सुरत जिल्ह्यात सोनगड ह्या ठिकाणी असणाऱ्या सेंट्रल पल्प मिल्स ह्या कारखान्याने कागदासाठी लागणारा एक कोटी रुपयांचा लगदा परदेशी निर्यात केला आहे. ह्या कारखान्यात गुजरात आणि महाराष्ट्र राज्यांनी भांडवल गुंतविलेले आहे. सुरत आणि डांग जिल्ह्यातील बांबूंचा उपयोग करून कारखान्यांत लगदा तयार करण्यात येतो. महाराष्ट्र, गुजरात आणि इतर राज्यांतील १५ कागदाच्या गिरण्या ह्या कारखान्यावर अवलंबून आहेत. कारखान्यासाठी १० कोटी रुपयांचे भांडवल लागले आहे. सध्या त्याची उत्पादनक्षमता ३३ हजार टनांची आहे. ती वाढवून ४० हजार टनांची करण्याचा विचार चालू आहे. डांग जिल्ह्यातील बांबूंच्या अरण्यात राहणाऱ्या ७ हजार आदिवासींना ह्या कारखान्यामुळे रोजगार मिळाला आहे.

### ध्वनीपेक्षा अधिक वेगाने प्रवास करण्यातील धोके

भौतिक जगाच्या विविध अंगोपांगांचे संशोधन करून आणि ते संशोधन व्यावहारिक सुखनिर्मितीच्या पातळीवर आणून शास्त्रज्ञांनी व तंत्रज्ञांनी मोठे कार्य केले आहे. ह्या ज्ञानाचा सदुपयोग व्हावा तितका होत नसला तरी त्याची उपयुक्तता वादातीत आहे. पण, ह्या प्रगतीबरोबरच धोक्याचे लाल कंदीलही दिसू लागले आहेत. विमानाचा प्रवास आता ध्वनीपेक्षाही अधिक वेगाने झेपावणाऱ्या विमानांनी सुरु होणार आहे. अमेरिकेतील बोइंग कंपनी अशी विमाने अनेक देशांना पुरविणार आहे. कंपनीने अशा प्रवासासंबंधी एक गुप्त अहवाल तयार केला असून त्यातील माहितीचा परिस्फोट अमेरिकेच्या काँग्रेसमधील एका सदस्याने केला आहे. अहवालात अशी माहिती देण्यात आली आहे, की ध्वनीपेक्षाही अधिक वेगाने उड्डाण करणाऱ्या विमानांची नियमित ये-जा सुरु झाली की, वातावरणात बदल घडून येऊ लागतील आणि हवा बिघडेल. विमानाच्या उड्डाणाच्या वेळी वातावरणाच्या वरच्या थरात एक प्रकारची वाफ साठू लागेल. त्यामुळे ढगांची निर्मिती अधिक प्रमाणात होऊ लागेल. परिणामी, पृथ्वीच्या तपमानात बराच फरक पडू लागेल. शिवाय वातावरणाच्या वरच्यां थरातील वाफ वाढल्याने तेथील हवेत असणाऱ्या 'ओझोन' नामक वायूचा नाश होऊ लागेल. पृथ्वीभोवती असणाऱ्या वातावरणामुळे सूर्याच्या प्रकाशातील घातक किरणे खालपर्यंत पोचत नाहीत. 'ओझोन' वायूचा जर मोठ्या प्रमाणावर नाश होऊ लागला तर ही घातक किरणे पृथ्वीवर सहजतेने पोचू लागतील आणि त्याचा जीवसृष्टीवर अतिशय विपरीत परिणाम होईल. शास्त्रीय ज्ञानाच्या सध्याच्या वापरातील अनेक धोक्यांपैकी हा एक आहे.

---

**निर्मात्याचा वैताग** — बंगलोर येथे बोलताना एका प्रसिद्ध चित्रपट निर्मात्याने असे मत व्यक्त केले आहे की, चित्रपटांना येणारा अवाढव्य खर्च सिनेतारका आणि तारे ह्यांना वाजवीपेक्षा भलतेच महत्त्व देण्याच्या प्रथेतून उद्भवतो. ही परिस्थिती बोलपट-निर्मात्यांनी स्वतःच निर्माण करून ठेवलेली आहे. प्रथितयश सिने-नटनट्यांच्या कोंडाळयातून बाहेर पडल्यास चित्रपटांचा निर्मितिखर्च खूपच कमी होऊ शकेल.

**रशिआत कानडी चित्रपट महोत्सव**— म्हैसूरमधील भारत-रशिआ सांस्कृतिक समितीच्या विद्यमाने रशिआत कानडी भाषेतील चित्रपटांचा महोत्सव भरविण्यात येणार आहे. तो १४ दिवसांपर्यंत चालणार आहे. कानडी बोलपट रशिआत दाखविण्याची ही पहिलीच वेळ असल्यामुळे म्हैसूरमधील सरकार व सांस्कृतिक समिती सर्वोत्कृष्ट कानडी बोलपटच पाठविले जाण्याची दक्षता घेत आहे.

**जप्त जमिनींसाठी नुकसानभरपाई**— १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धांत भाग घेतल्याबद्दल हरियानामधील २५ कुटुंबांच्या जमिनी ब्रिटिश सरकारने जप्त केल्या होत्या. हरियानाच्या सरकारने ह्या कुटुंबांना नुकसानभरपाई म्हणून रक्कम देण्याचे ठरविले आहे. रक्कम प्रतीकात्मक असेल.

**करवसुलीचा खर्च** — १९६८-६९ मध्ये भारत सरकारने वसूल केलेल्या प्रत्येक १,००० रु.स १९.६ रु. वसुलीसाठी खर्च आला.

**सुप्रीम कोर्टाचे आणि हाय कोर्टाचे न्यायाधीश**—सुप्रीम कोर्टाच्या न्यायाधीशांची कमाल संख्या १४ असू शकते. सध्या १२ न्यायाधीश आहेत. गेल्या तीन वर्षांत हाय कोर्टाच्या न्यायाधीशांची संख्या २४५ पासून ३०० वर गेली आहे. तरी सुद्धा हाय कोर्टातील तुंबलेले काम वाढतच चालले आहे. त्यावर उपाय सुचविण्यासाठी तीन न्यायाधीशांची कमिटी नेमण्यात आली आहे.

# तुम्हांला इंग्रजी येत नसेल तरी चिंता नाही. महाराष्ट्र बँकेत प्रादेशिक भाषेतूनही व्यवहार केला जातो



तुमचा लाखो रुपयांचा व्यवहार इंग्रजीवाचून अडणार नाहीं
महाराष्ट्र बँक म्हणजे तुमची भाषा समजणारी बँक तुमच्या जिव्हाळ्याची बँक!

**बँक ऑफ महाराष्ट्र**
हेड ऑफीसः ११७७, बुधवार पेठ, पुणे-२.

6961




हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले. (वार्षिक वर्गणी रु. ६)